# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांक:- २८/०१/२०१७

आज दिनांक २८/०१/२०१७ रोजी सैनु गोटा व त्यांची पत्नी शीला गोटा यांना नागपूर येथून व रामदास जराते यांना आरमोरी येथून गडचिरोली पोलीस पथकाने अटक केली.

दिनांक २२/०१/२०१७ रोजी पोमके गट्टा जांभिया येथे सैनु गोटा, त्यांची पत्नी शीला गोटा, रामदास जराते व इतर काही लोकांनी बेकायदेशीररित्या जमाव जमवून पोलीस मदत केंद्रावर मोर्चा आणून पोमके गट्टा जांभियाचा मुख्य दरवाजा बंद करुन घोषणाबाजी केली. तसेच सरकारी कामामध्ये अडथळा आणला व सोशल मिडीयामध्ये पोलीसांबाबत चुकीचे संदेश पसरवून पोलीस विभागाची बदनामी केली. तसेच मा. जिल्हाधिकारी यांनी काढलेला जमावबंदी आदेशाचे उल्लघंन करुन जमाव पांगवण्याचा आदेश दिला असता ते न मानता घोषणाबाजी करुन भारत सरकारने प्रतीबंधीत केलेल्या संघटनेस सहकार्य केले. म्हणून सैनु गोटा, त्यांची पत्नी शीला गोटा व रामदास जराते यांचे विरुध्द पोस्टे एटापल्ली येथे गुन्हा अप.क्र. ७/२०१७, कलम १४३, १४५, १४७, १८८, ३५३, ५०५ (ब), भा.द.वि. सह कलम ३७(१) १३५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आज सैनु गोटा व त्यांची पत्नी शीला गोटा व रामदास जराते यांना गडचिरोली पोलीसांनी अटक केली असून त्यांना न्यायालयात हजर केले जाईल.